| MHBI100003232024 | नियमीत दिवाणी दावा क्रमांक १९१/२०२२ मधील निशाणी क्र.६० वरील आदेश |
|---|---|

प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८, आदेश ६ नियम १७ अन्वये प्रस्तुतच्या दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जाप्रमाणे मुळ दावा हा मालकी जाहिर करुन कायम मनाई मिळणे बाबत दाखल केलेला आहे. दाव्याचे कामकाज प्रलंबित असतांना वादी यांना दाव्याचे कलम ६ मधील ओळ क्र.७ मध्ये अतिक्रमण करण्याच्या प्रयत्नात असुनच्या पुढे ''प्रतिवादींनी पश्चिम बाजुकडुन वादग्रस्त मिळकतीच्या हद्दी खुणा नष्ट केल्या आहेत त्या पुर्ववत करणे आवश्यक आहे' अशा मजकुराची प्रस्तावित दुरुस्ती करण्याची वादीने विनंती केली आहे. दुरुस्तीची परवानगी नाकारल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल जे कशानेही भरुन येणार नाही. त्यामुळे दुरुस्ती करण्याची परवानगी देण्याची विनंती केली.

०३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे सादर करुन अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादीचे कथन आहे की, वादीने दिलेला अर्ज हा बेकायदेशिर असुन प्रकरण पुराव्यासाठी प्रलंबित आहे. वादीला या स्टेजवर दुरुस्ती करता येणार नाही. प्रस्तुत दावा मालकी हक्क जाहीर करुन मनाई हुकूम मिळणे बाबत असल्यामुळे प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होईल. दाव्याचे विनंती मध्ये प्रस्तुत दुरुस्ती बाबत विनंती नसल्याने दुरुस्ती करता येणार नाही. वादीने यापुर्वी दाव्यात ब-याचवेळा दुरुस्ती केलेली आहे. प्रकरण प्रलंबित करण्याचे हेतुने प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि एकुणच अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत दाव्या दाव्याचे कलम ६ मधील ओळ क्र.७ मध्ये अतिक्रमण करण्याच्या प्रयत्नात असुनच्या पुढे ''प्रतिवादींनी पश्चिम बाजुकडुन वादग्रस्त मिळकतीच्या हद्दी खुणा नष्ट केल्या आहेत त्या पुर्ववत करणे आवश्यक आहे' अशा मजकुराची दुरुस्ती करण्याची वादीने विनंती केली आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता सदरचा दावा हा मालकी जाहिर करुन कायम मनाई मिळणेसाठीचा आहे. प्रस्तुतचा दावा आजरोजी पुराव्यासाठी प्रलंबित आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ०६ नियम १७ नुसार न्यायालय कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर पक्षाला त्याचे दाव्यात योग्य वाटेल अशारितीने आणि योग्य वाटेल अशा अटींवर बदल किंवा दुरुस्ती करण्याची परवानगी देऊ शकते आणि पक्षामधुन विवादास्पद खरे प्रश्न निश्चीत करण्याच्या उद्देशाने आवश्यक असलेल्या सर्व दुरुस्त्या केल्या जातील परंतु, सदर नियमाच्या परंतुकानुसार खटल्याची सुनावणी सुरु झाल्यानंतर जर पक्षाने दुरुस्ती करावयाची झाल्यास पक्षाने योग्य ती काळजी घेवुन सदरची बाब सुनावणी होण्यापुर्वी मांडणे शक्य नव्हते हे दाखवुन देणे गरजेचे आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये दिनांक ०५.०८.२०२५ रोजी दावा पुराव्यासाठी लागलेला आहे. परंतु, वादीने अद्याप पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे तांत्रीक दृष्टया दाव्याची सुनावणी सुरु झाली आहे, असे म्हणता येणार नाही.

०५. दाव्यातील कलम २ मधील मिळकत ही स.क्र.१/१ मधील वादग्रस्त प्लॉट असुन त्याचे ००.०१.९१ आर क्षेत्र आहे. सदरची प्रस्तावीत दुरुस्तीमध्ये वादी व प्रतिवादी यांचे स्थावर मिळकतीबाबतचे हितसंबंध गुंतलेले आहेत. जरी वादी यांना प्रस्तुतची दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात आली, तरी प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही अथवा दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. या उलट न्यायाचे दृष्टीने व दाव्याचे अंतिम निराकरण होण्याचे दृष्टीने त्याचप्रमाणे दावा प्रलंबित असतांना झालेल्या वर नमुद बदलांच्या अनुषंगाने आणि सुचित दुरुस्तीच्या स्वरुपाचा विचार करता, वादीस वादपत्रात दुरुस्ती करणेकामी परवानगी देणे न्यायोचित होईल. एकुणच वर नमुद

कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

(१) निशाणी क्र.६० वरील अर्ज रूपये ३००/– च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

(२) वादीस पुढील तारखेपावेतो अर्जात नमुद दुरुस्ती वादपत्रात करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(३) वादीने दुरुस्ती केल्यानंतर अभिलेखावर न्यायालयासाठी तसेच प्रतिवादींसाठी दुरुस्त वादपत्राच्या प्रती सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात येत आहे.

(४) खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना द्यावी.

Digitally signed by POURNIMA VIJAY CHAVAN
Date: 2026.05.02 17:18:28 +0530

(पी.व्ही.चव्हाण)
दिनांकः– ०२.०५.२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, केज.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 02.05.2026 |
| Transcribed on | : | -------- |
| Checked & signed on | : | 02.05.2026 |

Sd/-
M.A.Kulkarni.
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.